International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# संदर्भनिर्देशनाचे विविध प्रकार

**डॉ. गिरीश मोरे**
प्राध्यापक, मराठी विभाग, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रुकडी
*Corresponding Author -* **डॉ. गिरीश मोरे**
Email- moregirish12@gmail.com

**प्रास्ताविक**

प्रश्न वा समस्या कळणे ही संशोधनाची पहिली पायरी असते. संबंधित विषयावर यापूर्वी कुणी काही मांडले आहे का ,याचा शोध घेणे हा पूर्वाभ्यास असतो. संशोधनपर लेखनातला अतिशय महत्त्वाचा भाग म्हणजे विश्लेषण. विश्लेषण करताना काही आधार किंवा पुरावे द्यावे लागतात, त्यास संदर्भ असे म्हणतात. त्या संदर्भाची शास्त्रीय नोंद घेतली तर ते संदर्भनिर्देशन होते. प्रस्तुत ठिकाणी संदर्भनिर्देशनाचे कोणकोणते प्रकार आहेत आणि ते कशा स्वरूपाचे आहेत, हे मांडावयाचे आहे.

**संदर्भ म्हणजे काय ?**

संदर्भ या शब्दासाठी इंग्रजीत ' Citation ' (साइटेशन) हा शब्द आढळतो. 'The quoting of an author or a book in support of a fact.' (Navaneet Advanced Dictionary : 1996: p131) त्यासाठी मराठीत ' उध्दरण ', ' उल्लेख निर्देश ', ' अवतरण '(उतारा),' उद्धृत केलेला मजकूर ', ' वाक्संहिता ', असे विविध पारिभाषिक शब्द वापरले जातात. संशोधनपर लेखनात, आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ एखाद्या ग्रंथाचा, त्यातील मजकुराचा, ओळींचा, वाक्य किंवा शब्दांचा आधार घेणे म्हणजे संदर्भ होय.

संशोधनपर लेखनात आपण मांडलेल्या मताला शह देणारी वा विरोधी अर्थ प्रकट करणारी काही मते मांडली असतील तर त्याचा निर्देश करणे आवश्यक असते. अशावेळी संबंधित उतारा जशास तसा द्यावा लागतो. त्याशिवाय त्या मताचे खंडन वा मंडन करता येत नाही. यावरून असे म्हणता येते ; संशोधन विषय शास्त्रीय पद्धतीने स्पष्ट करताना इतरांच्या सामग्रीतून घेतलेली मूळ माहिती म्हणजे संदर्भ होय. आपल्या मतमांडणीसाठी दिलेल्या संदर्भाचा स्पष्ट उल्लेख करणे म्हणजे संदर्भनिर्देशन होय. अवतरण चिन्हात दिलेला मजकूर, मत , विचार , चिकित्सा , स्पष्टीकरण माझे नसून ते इतरांचे आहे , हे नोंदवणे आवश्यक असते. तसे नोंदवले नाही तर त्याचे श्रेय मूळ लेखकाला दिले जात नाही. संशोधन क्षेत्रात ही कृती चौर्य या प्रकारात मोडते.

**संदर्भनिर्देशाची भारतीय परंपरा**

संदर्भनिर्देशन करण्याची भारतीय परंपरा फार जुनी आहे. पाचव्या शतकातील कालीदास आपल्या लेखनात आपल्या पूर्वीच्या कवींचा उल्लेख करीत असत. सातव्या शतकातील बाणाने आपल्या लेखनावर कोणाचा प्रभाव आहे , हे सांगण्यासाठी श्रेयनामावली दिली आहे. दहाव्या शतकातील सोमदेव सुरी याने ' यशस्तिलक ' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने वाङ्मयचौर्य करणाऱ्यांचा निषेध केला आहे. काव्य रचताना इतर कोणाचे काव्य वापरायचे असेल तर ते अत्यंत श्रद्धेने वापरले पाहिजे मात्र ते स्वतःचे आहे, असे सांगितले तर काव्यचौर्य होते. काव्यचौर्य हे निषेधार्ह आहे, असे मानले जात होते. बाराव्या शतकातील, महानुभाव पंथातील एक कवी नरेंद्र पंडित याने ' रुक्मिणीस्वयंवर ' हा काव्यग्रंथ लिहिला. त्याविषयी घडलेली घटना ' स्मृतिस्थळ ' या गद्यग्रंथात म्हाइंभटाने दिली आहे. अतिशय चिंतन करून नरेंद्र पंडिताने ' रुक्मिणीस्वयंवर ' हा काव्यग्रंथ रचला. रामदेवरायाच्या दरबारात तो

वाचला. असा ग्रंथ आपल्या नावावर असावा अशी अभिलाषा राजाच्या मनात निर्माण झाली. प्रत्येक ओवीसाठी एक सुवर्णमुद्रा देण्याचा प्रस्ताव राजाने ठेवला. मात्र " ना राजे हो आमचेया कवीकुळा बोलु लागैल : " ( इर्लेकर २००७ : ४१ ) असे म्हणून कवी नरेंद्र पंडिताने त्यास नकार दिला. एका रात्रीत काव्यग्रंथाची नक्कल केली आणि महानुभाव पंथात ते सामील झाले.

संदर्भ न देता इतरांची माहिती, विचार, निष्कर्ष वा इतर बाबी स्वतःच्या नावावर घेणे ही कृती संशोधन क्षेत्राची काळी बाजू आहे. विनासायास, प्रयत्न न करता, विनाकष्ट मजकूर मांडणे हे चौर्य आधुनिक काळातही वाढत चालले आहे. यावर पायबंद घालण्यासाठी ब्रिटिशकाळात १९११ मध्ये ' प्रताधिकार कायदा ' अस्तित्वात आला. पुढे १९५७ मध्ये ' भारतीय प्रताधिकार कायदा ' निर्माण करण्यात आला. त्यानुसार मूळ लेखकाचे श्रेय-संदर्भ (attribution)नमूद करणे आवश्यक आहे. (mr.m.wikipedia.org) असे म्हटले गेले. तरीही यात कमी झाली नाही. त्यामुळे संगणकीकृत Plagiarism नावाची यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

संशोधन विषय सिध्द करण्यासाठी लागणारे संदर्भ हे अनेक ठिकाणी उपलब्ध असतात. उदा. लेख, लेखांक, स्तंभलेखन, पुस्तिका, ग्रंथ, संपादित ग्रंथ, खंडात्मक ग्रंथ, प्रबंध, कोश, शब्दकोश, चरित्रकोश, आत्मचरित्रे, भौगोलिक साधने, वार्षिके, नियतकालिके, वर्तमानपत्र, सूची वाङ्मय, हस्तलिखिते, दैनंदिनी, पत्रव्यवहार, पत्रके, जाहिरनामे, इंटरनेट, वेब, ब्लॉग, मेल, ध्वनिफीत, चित्रफित, मुलाखती, छायाचित्रे, ई-जर्नलस, ईबुक्स, अभिलेखागारातील साधने, फेसबुक, बातम्यांची कात्रणे. अशा किती तरी साधनांचा उपयोग करता येतो. या साधनांची प्राधान्याने क्रमवारी लावणे, त्यातील सत्यता तपासून घेणे, हेही कार्य संशोधनात मोडते.

**संदर्भनिर्देशनाचे प्रकार**

संशोधनात संदर्भ देण्याचे विविध प्रकार आहेत. त्यातील काही पध्दतींचा उपयोग केला जातो. अनेक संस्था आणि विद्यापीठांनी संशोधन करताना संदर्भ कसा द्यावा, त्याचा निर्देश कसा करावा, या याविषयी मार्गदर्शिका तयार करवून घेतल्या आहेत. त्यानुसार कशाप्रकारे संदर्भांची नोंद घ्यावी असे निश्चित केले आहे. संशोधकांने कोणत्या प्रकारे नोंद करावी, हा त्या संस्था, विद्यापीठे आणि संशोधकांचा अधिकार आहे. इथे काही निवडक संदर्भनिर्देशन प्रकारांचे वेगळेपण लक्षात घेता येईल.

साधारणतः संदर्भ म्हणून एखादे अवतरण उद्धृत केले तर , शेवटच्या शब्दानंतर दिलेल्या दुहेरी वा एकेरी अवतरण चिन्हाच्या डोक्यावर अनुक्रमांक दिला जातो. जितकी अवतरणे तितके अनुक्रमांक दिले जातात. लेख, प्रकरण वा पुस्तकाशेवटी त्या त्या अनुक्रमांकापुढे मूळ लेखक, मालक, पुस्तक नाम, प्रकाशन, ठिकाण, वर्ष आणि पृष्ठ क्रमांक दिला जातो. यातून संदर्भनिर्देशन व्यवस्थित होते. दिलेल्या अवतरणांचे संदर्भनिर्देशन पाहण्यासाठी लेखाशेवटी वा पुस्तकाशेवटी पुन्हा पुन्हा जावे लागते. यावर उपाय म्हणून पूर्वी ज्या पानावर संदर्भ ओळी आहेत , त्याच पानाच्या शेवटी तळाला संदर्भनिर्देशन केले जात होते. अनुक्रमांकाऐवजी * + Δ अशी काही चिन्हे दिली जात होती. तळटिपेत संदर्भनिर्देशनाबरोबर अधिकची पूरक माहिती लेखक किंवा संपादक देत असत. यातून वाचकांची, नवीन संशोधन लेखकाची सोय होत होती.

स्वतंत्र किंवा खाजगी प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कित्येक पुस्तकांत संदर्भनिर्देशन अचूक , शास्त्रीय वा परिपूर्ण झालेले आढळत नाही. भरपूर अवतरणे किंवा उद्धृत मजकूर दिला जातो मात्र त्याचे निर्देशन केले जात नाही. संस्थात्मक पातळीवर संशोधन लेखन करताना संदर्भनिर्देशन करणे अत्यंत बंधनकारक असते. ती ती विद्यापीठे, प्रकाशन संस्था, मंडळे आपली स्वतःची संदर्भनिर्देशन स्टाईल विकसित करतात. त्याच प्रकारे संशोधन लेखन करण्याची अट घालतात. त्या त्या संस्थांनी विकसित केलेली स्टाईल इतर संस्था वा व्यक्ती वापरू शकतात. त्यातून त्यांना संशोधन लेखनाची शिस्त आणि एकसारखेपणा वाढवायचा असतो. सध्या जगभरात प्रचलित असलेले संदर्भनिर्देशनाचे प्रकार काही

बाबतीत समान आहेत. त्या त्या संस्थांच्या नावावरून ते ओळखले जात आहेत. उदा. (MLA) ,(APA) ,(MHRA) ,Harvard System , Chicago Style , Turabian , Parenthetical Author-Date Citation अशा किती तरी प्रकारे संदर्भनिर्देशन केले जाते. त्यातील काही प्रकाराचे स्वरूप शोधता येते.

**MHRA (Modern Humanities Research Association) Style**

एम.एच.आर.ए. या प्रकारात संदर्भनिर्देश हा तळटिपेत केला जातो. अवतरणानंतर शीरोभागी अनुक्रमांक दिला जातो. त्या संदर्भाची माहिती त्याच पानावर तळात दिली जाते. एकाच पानावर दोन संदर्भ आले असतील तर तळात दोन संदर्भांची माहिती दिली जाते. एकाच पानावर एकाच लेखकाचे दोन संदर्भ आले असतील तर दुसऱ्या संदर्भासाठी फक्त आडनाव आणि पृष्ठ क्रमांक दिला जातो. प्रथम लेखकाचे नाव, पुढे पुस्तकाचे वा स्त्रोताचे शीर्षक इटालिकमध्ये दिले जाते. त्यापुढे कंसात प्रकाशन संस्था, ठिकाण, वर्ष दिले जाते.पुढे पृष्ठ क्रमांक दिला जातो. उदा. १. डॉ.गिरीश मोरे , *मराठी निबंध : उद्गम आणि विकास* (स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००९ )पृ.१३ २. मोरे , पृ. १७ त्यामुळे एम.एच.आर.ए. या संदर्भनिर्देशनास तळटीप संदर्भनिर्देशन असे म्हणतात. शेवटी एकत्रित आकारविल्ह्यानुसार संदर्भ सूची दिली जाते.

**Modern Language Association ( MLA)**

मॉडर्न लॅंग्वेज असोसिएशन, अमेरिका या संस्थेने एम.एल.ए. स्टाईल विकसित केली आहे. पहिल्या भागात अगदी संक्षिप्त निर्देश करून शेवटी पूर्ण माहिती दिली जाते. संदर्भापुढे कंसात लेखकाचे आडनाव लिहून कंसात फक्त पृष्ठ क्रमांक दिला जातो. उदा. (डांगळे २०१) दुसऱ्या भागात लेखनाशेवटी आडनाव, नाव, ग्रंथनाम वा स्त्रोताचे शीर्षक, आवृत्ती, खंड क्रमांक, प्रकाशन आणि पृष्ठ क्रमांक इ. माहिती दिली जाते. उदा. डांगळे अर्जुन *दलित विद्रोह :* लोकवाङ् मयगृह , मुंबई, २०००

**APA (American Psychological Association) Style:** ए.पी.ए. प्रकारात मजकुरापुढील कंसात लेखकाचे आडनाव देऊन स्वल्पविराम दिला जातो, पुढे वर्ष लिहिले जाते , पुन्हा स्वल्पविराम देऊन पृष्ठ क्रमांक दिला जातो. उदा. (कर्वे ,१९५१ ,पृ. ३१) दोन लेखक असतील दोघांची आडनावे , पेक्षा जास्त असतील तर पहिले नाव व इतर असे लिहिले जाते. ई-बुकला पृष्ठ क्रमांक नसेल तर परिच्छेद क्रमांक दिला जातो. शेवटी क्रमानुसार संदर्भाची पूर्ण माहिती दिली जाते. उदा. कर्वे इरावती (१९५१) : *मराठी लोकांची संस्कृती ,* देशमुख आणि कंपनी ,पुणे

**Harvard System**

हार्वर्ड संदर्भनिर्देशन पध्दती ही इतरांपेक्षा थोडी वेगळी आहे. या प्रकारात अवतरण वा संदर्भ मजकुरानंतर कंसात लेखकाचे आडनाव, वर्ष आणि पृष्ठ क्रमांक दिला जातो. लेखक व वर्ष यात स्वल्पविराम दिला जात नाही. उदा. ( भवरे २००१ , पृ. ३७ ) लेख, प्रकरण वा अगदी शेवटी संदर्भाविषयी परिपूर्ण माहिती दिली जाते. उदा.१. भवरे महेंद्र , २००१ , दलित कवितेतील नवे प्रवाह ,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

हार्वर्ड संदर्भनिर्देशन पध्दती ही ए.पी.ए. सारखी आहे असे वाटते. ए.पी.ए. मध्ये संदर्भानंतर कंसात दिलेल्या आडनावानंतर स्वल्पविराम देतात मात्र हार्वर्डमध्ये स्वल्पविराम न देता वर्ष दिले जाते. शेवटी दिलेल्या माहितीतही कंसात वर्ष न देता स्वल्पविरामानंतर ते दिले जाते. बाकी इतर बाबतीत ए.पी.ए. आणि हार्वर्ड संदर्भनिर्देशन सारखे आहे

**Parenthetical Author-Date Citation**

पॅरेंथेटिकल ऑथर-डेट साइटेशन या संदर्भनिर्देशनात संदर्भापुढे कंसात लेखक वर्ष लिहून : असे चिन्ह दिले जाते. त्यापुढे फक्त पृष्ठ क्रमांक दिला जातो. उदा. (रसाळ १९८२ : ४९)

लेख किंवा प्रकरणाशेवटी संदर्भ यादीत त्याविषयी परिपूर्ण माहिती दिली जाते. उदा. रसाळ , सुधीर (१९८२) : कविता आणि प्रतिमा , मौज प्रकाशन गृह , मुंबई या पध्दतीत संदर्भ यादी देताना आडनावानंतर स्वल्पविराम दिला जातो. संकेतस्थळावरील परीक्षण , लेख , पुस्तक आधारासाठी घेतले असेल तर संकेतस्थळाची लिंक देऊन भेट दिलेली तारीख नोंदवली जाते.

उदा.http://yashwantmanohar.com/pdf/Baudh

a%20Sanskruti%20Ani%20Sah (संकेतस्थळाला भेट २४ जून २०२२) याशिवाय **शिकागो** (Chicago Style) या संदर्भनिर्देशनाचे स्वरूप एम.एच.आर.ए. प्रमाणेच आहे. या प्रकारात तळटिपेत संदर्भाची माहिती दिली जाते. **टरबियन** (Turabian Style ) या प्रकारातही तळटिपेत संदर्भनिर्देशन केले जाते.

**समारोप**

एकूणच जगभरात संशोधन लेखन होत आलेले आहे. ते अव्याहतपणे सुरू आहे. त्यात काळानुसार आणि गरजेनुसार संदर्भनिर्देशनाचे प्रकार निर्माण होत आहेत. संदर्भनिर्देशनातील तोचतोचपणा , पुनरावृत्ती टाळावी , त्यात स्पष्टता आणि अचूकता यावी , मूळ लेखकावर अन्याय होऊ नये , वाङ्मयचौर्य थांबावे , पाल्हाळिकता कमी व्हावी , अशा किती तरी बाबींमुळे असे बदल होत आहेत. आपली संस्था , मंडळ किंवा विद्यापीठ याची संदर्भनिर्देशनाचे स्वरूप अनन्यसाधारण , वेगळे आणि चांगले व्हावे , हाही हेतू त्यामागे असू शकतो.

**संदर्भ**

१. Navaneet Advanced Dictionary, 1996

२. इर्लेकर सुहासिनी , *नरेंद्रकृत आद्य मराठी महाकाव्य* (२००७) : पद्मगंधा प्रकाशन , पुणे

३. https://www.wikiwand.com (२५ जून २०२२ रोजी भेट)

४.https://subjectguifes.york.ac.uk (२५ जून २०२२रोजी भेट)

५.https://style.mla.org (२५ जून २०२२रोजी भेट)

६.https://uscmed.sc.libguides.com (२५ जून २०२२रोजी भेट)

७. https://utas.libguides.com (२५ जून २०२२रोजी भेट)

८. https://en.m.wikipedia.org (२५ जून २०२२रोजी भेट)